# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. ०८/०८/२००६

आज दि. ०८/०८/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. २७/०७/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला बालकल्याण |
| ३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ६) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ७) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| ८) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| ९) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १०) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १३) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| १४) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| १५) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| १६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १८) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| १९) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| २०) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| २१) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| २२) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| २३) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| २४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. १ |
| २५) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| २६) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| २७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| २८) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| २९) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ३०) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ३२) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ३३) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ३५) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ३६) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ३७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ३८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ३९) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ४१) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| २) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ८) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ११) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १४) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| १५) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| १६) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १७) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| १८) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| १९) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २०) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २१) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २२) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| २३) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| २४) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| २५) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०४ |
| २६) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| २७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २८) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| २९) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ३०) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ३१) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ३२) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ३३) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ३४) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ३५) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ३६) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ३७) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण समिती) |
| ३८) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ३९) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |

३)	श्रीम. पाटील भानु भगवान	सदस्या
४)	श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर	सदस्या

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेला सुरुवात करावी.

(''वंदे मातरम'' या राष्ट्रगीताने सभेला सुरुवात करण्यात आली.)

(नगरसचिव ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

आदरणीय महापौर साहेबांच्या परवानगीने तथा पिठासीन अधिकारी ह्यांच्या परवानगीने, आज आपली मा. महासभा नियमित अजेन्ड्याप्रमाणे बोलावण्यात आलेली आहे मी त्याबद्दल मा. महापौर साहेबांचे आभार मानतो. परंतु, सभागृहातील सन्मा. सदस्यांची उपस्थिती लक्षात घेता त्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केले असता मा. महापौरजी तथा पिठासीन अधिकारीजी आमच्यामध्ये अशी एक परिस्थिती निर्माण झालेली आहे की, ह्या सदनाच्या एक सन्मा. मान्यवर ज्यांच्याबद्दल या संपूर्ण सभागृहाला प्रचंड आदर आहे. त्या आदरणीय मायरा ताई मेन्डोंसा अत्यंत क्लिष्ट अशा आजारपणामध्ये आहे. त्या आजारी असल्यामुळे जवळ जवळ, हा गेल्या १०-१२ दिवसांचा कालखंड सत्ताधारी पक्ष आणि सभागृहातील सन्मा. सदस्य, इतरही पक्षाचे नेते, सन्मा. नगरसेवक ह्यांना एक गोंधळवाणी परिस्थिती  वाटत आहे. मला जर व्यक्तिशः विचारले तर, रिअली आय एम सो मच अपसेट की, खरोखरच या सभागृहामध्ये कामकाजामध्ये अगदी सक्रिय उत्साहाने भाग घेण्याची आमची मनस्थिती नाही. तसेच, आजुबाजूला असलेली सगळी पावसाळी परिस्थिती विचारात घेता, मी सभागृहाला अशी विनंती करत आहे की, आजची सभा तहकूब करून दोन दिवसांनी आपण ही सभा घ्यावी. याकामी मी उपस्थित सर्व पक्षांच्या गटनेत्यांना, त्यांच्या नगरसेवकांना ही सभा तहकूब करण्यासाठी आपण सहदिल व्हावे. आमच्या सुचनेशी सहमत व्हावे अशी मी आपल्याकडून सहकार्याची अपेक्षा करतो. धन्यवाद.

**ज्युडी डिसोझा :-**

माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की, आता सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी जी काही मन परिस्थिती सांगितली. ती परिस्थिती खरी आहे. कारण मा. मायरा मेंन्डोसा मॅडम, आपल्या सभागृहाच्या माजी महापौर ही होत्या आणि ह्या व्यक्तीने हा सभागृह हसत खेळत आणि ज्या हिशोबाने त्यांनी ते दिवस राबवले होते आणि आज ती व्यक्ती जीवनमरणाच्या परिस्थितीत हॉस्पीटलमध्ये ॲडमिट आहे आणि त्या परिस्थितीत ह्या सभागृहामध्ये कुठलीही सभा चालवणे हे कुठल्याही नगरसेवकाला मला असे वाटत नाही की, ते मनापासून येथे बसणार. म्हणून आज सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी जो ठराव मांडलेला आहे की, आजची सभा तहकूब करायला पाहिजे. त्याला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य लिओ कोलासो (गुरूजींनी) ह्यांनी मांडलेला ठराव व त्याला दिलेले अनुमोदन, माजी मा. महापौर मायराजी मॅडम त्यांचे आजारपण किंवा त्यांच्याबद्दलचा आदर. या सभागृहातील कोणत्याही सदस्याचे दुमत असण्याचे कारण नाही. त्यांच्या तब्येतीत लवकरात लवकर सुधारणा होवो असे सभागृह प्रार्थना करते. मी अशी विनंती करेन की, सन्मा. सदस्यांनी ठराव मांडला आहे आणि त्याला अनुमोदन ही दिलेले आहे. त्याला विरोध करायचे काही कारण नाही. पण शहरातील एकंदरीत पुर परिस्थिती, डेग्यूची परिस्थिती आहे. सभागृहाचे कामकाज आज तहकूब करून लगेच आपण कधी चालू करतो? उद्या चालू करतो की, परवा चालू करतो कारण आपल्याला दोन्ही गोष्टी सांभाळायला लागतील. सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करण्यामध्ये दुमत नसावे अशा ही मताचा मी आहे. पण ही सभा कधी चालू करायचे त्याचे मा. महापौरांनी लगेच निर्णय जाहिर करायला पाहिजे. कारण काही विषय महत्त्वाचे आहे. मा. महापौर साहेबा आपण सांगा की, पुन्हा सभा केव्हा घेण्यात येईल?

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह, आदरणीय माजी महापौर मायरा मेन्डोंसा मॅडम ह्यांची गेल्या आठ दिवसापासून त्यांची प्रकृती थोडीशी ढासळलेली आहे आणि आपल्या सर्वांच्या प्रार्थनेने थोडासा त्यांच्या तब्येतीत सुधार झालेला आहे आणि पुर्ण शहराच्या आमच्या लाडक्या अशा माजी महापौर ह्यांच्या तब्येतीत चांगल्याप्रकारे सुधार व्हावा आणि त्या हसत खेळत लवकरात लवकर घरी यावे. अशी संपूर्ण शहराची, सभागृहाची धारणा आहे आणि आजची मनस्थिती सभागृहात गैरहजर असलेल्या नगरसेवकांवरुन दिसून येते की, आजच्या सभेकरिता सन्मा. नगरसेवकांची मानसिकता नाही. त्यामुळे सभागृहातून बहुतेक सदस्यांनी सभा तहकूबीची मागणी केलेली आहे. आमच्या लाडक्या माजी महापौरांबद्दल सर्वांना आदर आहे आणि सर्वांची ईश्वरी चरणी प्रार्थना आहे की,

त्यांच्या तब्येतीत लवकरात लवकर सुधार व्हावा. म्हणून आजची ही सभा तहकूब करण्यात येत आहे आणि पुढील सभेची वेळ आपल्याला लवकरच एक ते दोन दिवसात देउन पुढील सभा कधी लावायची ह्याबाबत आपल्याला सुचना नोटीस कळवण्यात येईल. धन्यवाद.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.३५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**